ePaper

| वर्ष - 8 | अंक - 204 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 7 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आगामी निवडणुकीत भाजप स्वतंत्र लढणार : मंत्री अतुल सावे




### आतील पानांत


- आझम वेगळ्याच कारणामुळे चिंतेत
- भारताचा इंग्लंडवर सहज विजय!
- अमेरिकेला जाब विचारू शकत नाही!
- माहिती नसलेल्या एजंटला ४५ लाख


## प्रस्तावित “शिवनेरी” जिल्हाच्या मागणीवरुन

# उपमुख्यमंत्री अजित पवार- आ. महेश लांडगे आमने-सामने!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोरच वादाची ठिणगी : जिल्हा विभाजन होणार नाही: अजित पवार यांची स्पष्टोक्ती

| पिंपरी- चिंचवड | महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील भारतीय जनता पार्टीचे नेते तथा आमदार महेश लांडगे आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील राजकीय रस्सीखेच पुन्हा एकदा समोर आली. राज्यात जिल्हा विभाजनाचा प्रस्ताव आहे, तसे असेल तर पुणे जिल्ह्यातून नवीन निर्माण होणाऱ्या जिल्ह्याला “शिवनेरी” नाव द्यावे, अशी जाहीर मागणी महेश लांडगे यांनी केली. यावर अजित पवार यांनी अशाप्रकारे जिल्हा विभाजन होणार नाही. बातम्यांवर विश्वास ठेवू नका, अशी स्पष्टोक्ती केली. त्यामुळे 'शिवनेरी' जिल्ह्याच्या निमित्ताने अजित पवार- महेश लांडगे आमने-सामने आलेले पहायला मिळत आहे.**



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या इमारतीचे भूमिपूजन चिखली येथील प्रस्तावित जागेत करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री पवार, गृहराज्य मंत्री योगेश कदम महायुतीचे आमदार उपस्थित होते.

### ... यामुळे वादाची ठिणगी!

आमदार महेश लांडगे यांनी आपल्या भाषणामध्ये शिवनेरी जिल्हा तयार करण्याची जाहीर मागणी केली. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोरच उपमुख्यमंत्री पवारांचा जिल्हा विभाजनाला स्पष्ट नकार दिला. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय भूमिपूजन सोहळ्याच्या निमित्ताने आमदार महेश लांडगे यांनी शहरभर 'ब्रँडिंग' केले आणि भाजपाला श्रेय घेतले. यावरुन वादाची ठिणगी पडली. कारण, महेश लांडगे यांनी शहरात भाजपाची जाहीरातबाजी केली. होर्डिंग आणि प्रसारमाध्यमांध्ये जाहीराती प्रसिद्ध झाल्या. या जाहिरातींमध्ये भाजपा प्रदेशाध्यक्ष आणि पक्षश्रेष्ठींचे फोटो झळकले. महायुतीचे सरकार असताना आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री असतानाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा फोटो जाहिरातींमध्ये दिसला नाही. ही बाब अजित पवार यांच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिली. त्यामुळे सकाळीपासूनच अजितदादांचा पारा चढला होता, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### अजित पवारांचा विरोध कशासाठी?

राज्यातील 35 जिल्ह्यांचे विभाजन करुन नवीन 22 जिल्हे निर्मितीचा प्रस्ताव आहे. तसेच, 2026 मध्ये लोकसभा आणि विधानसभा मतदार संघांची पुन:रचना प्रस्तावित आहे. लोकसंख्या वाढीनुसार, पुणे जिल्ह्याचे दोन मतदार संघ होणार आहे. त्यामुळे उत्तर पुणे आणि दक्षिण पुणे असे दोन मतदार संघ निर्माण होवू शकतात. अशातच पुणे जिल्ह्याचे विभाजन करुन पुणे आणि 'बारामती असे दोन जिल्हे निर्माण करावेत, असाही एक मतप्रवाह आहे. उत्तर पुणे जिल्हात छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान “शिवनेरी” असल्यामुळे नव्या जिल्ह्याला “शिवनेरी” नाव द्यावे, अशी मागणी शिव-शंभूप्रेमी आणि आमदार महेश लांडगे यांची आहे. बारातमी विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व अजित पवार करतात. बारामतीचे वर्चस्व कमी होईल, या भावनेतून अजित पवार “शिवनेरी” जिल्ह्याला विरोध करीत आहेत, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### अजित पवारांचे नाव घेतले, पण दादा विसरले!

आमदार महेश लांडगे यांनी आपल्या भाषणामध्ये पिंपरी-चिंचवडच्या विकासाचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भारतीय जनता पार्टीला दिले. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पारा चढला. एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी भारतीय जनता पार्टीची सत्ता आणली. त्यावेळी अजित पवार यांना खुला विरोध केला. याची सल अजित पवारांच्या मनात आहे. तसेच, शहराच्या विकासासाठी 1992 पासून 2017 पर्यंत योगदान दिले. पण, नामोल्लेख केला नाही. असा संकुचितपणा नको, असे खडेबोलही अजित पवारांनी सुनावले. मात्र, आमदार महेश लांडगे यांनी भाषणाच्या सुरूवातीलाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाचा उल्लेख केला होता.

पण, स्वतंत्र पोलीस आयुक्तालय आणि विकासकामांचे श्रेय मिळत नाही. याची खंत वाटत असल्यामुळेच महेश लांडगे यांना 'टार्गेट' केले, असे चित्र यानिमित्ताने पहायला मिळाले.



### काय म्हणाले महेश लांडगे ?

1. पुणे जिल्ह्याचे विभाजन होणार असेल, तर शिवनेरी जिल्हा करा.
2. पिंपरी-चिंचवडचा विकास 2014 नंतर महायुतीच्या काळात झाला.
3. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच पिंपरी-चिंचवड प्रगतीपथावर

### काय म्हणाले अजित पवार ?

1. जिल्ह्यांचे विभाजन होणार, अशा बातम्यांमध्ये तथ्य नाही. जिल्हा विभाजन करणार नाही.
2. पिंपरी-चिंचवडचा विकास मीसुद्धा केला. महेश लांडगे नाव घ्यायला का विसरले माहिती नाही.
3. काम करणाऱ्यांना श्रेय द्या. कंजुसपणा करू नका, मीसुद्धा 1992 पासून पिंपरी-चिंचवडचा विकास केला.

# महायुतीच्या बातम्या नीट द्या नाहीतर!

## हातात AK47 घेत अजित पवारांची मिश्किल टिप्पणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार बैठक असो, सभा असो की पत्रकार परिषद ते कायम स्पष्टपणे आणि मिश्किलपणेही बोलताना अनेकवेळा पाहिले आहे. मागे त्यांच्या काही विधानांमुळे वादही निर्माण झाले होते. आता आज पुण्यातील चाकणमध्ये अजित पवारांनी केलेली एक मिश्किल टिप्पणी राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे.**



पिंपरी चिंचवडमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उद्घाटन झाले. यानंतर त्यांनी चाकणच्या निबे उद्योग समूहाला भेट दिली होती. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री पवार यांनी हातामध्ये एके ४७ बंदूका घेतल्याचे पाहायला मिळाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवसी यांनी नेम लावण्याचा प्रयत्न केला. तर अजित पवारांनी उपस्थित पत्रकारांवर बंदूक रोखत “महायुतीच्या बातम्या नीट द्या नाहीतर बघा”, असे विधान केले अन् उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. ते पुढे म्हणाले की, “आम्ही दोघं तर सगळ्यांना उडवून टाकू.” त्यांनी पुढे असेही म्हटले की, “आता एवढंच छापतील.”सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हातात एके४७ घेतल्याचे दिसत आहे. या व्हिडिओमध्ये कॅबिनेट मंत्री उदय सामंत आणि कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटीलही दिसत आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यातील चाकण येथे ‘निबे लिमिटेड’ प्रकल्पातील अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, शस्त्र, व संरक्षण सामग्रीची पाहणी केली. यावेळी मंत्री उदय सामंत, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, निबे लि.चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे, निबे डिफेन्स अँण्ड एरोस्पेस लि. चे संचालक प्रकाश भामरे आदी उपस्थित होते.

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अखत्यारित येणाऱ्या विविध विकासकामांचे आणि उपक्रमांचे उद्घाटन, भूमिपूजन आणि लोकार्पण केले. यामध्ये पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाची नवीन प्रशासकीय इमारत, पुणे पोलीस अधीक्षक कार्यालयाचे भूमिपूजन आणि महाळुंगे औद्योगिक पोलीस संकुल व देहू रोडवरील पोलीस विश्रामगृह या इमारतींच्या भूमिपूजनाचा समावेश होता. पिंपरी चिंचवडमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उद्घाटन झाले. यानंतर त्यांनी चाकणच्या निबे उद्योग समूहाला भेट दिली होती. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री पवार यांनी हातामध्ये एके ४७ बंदूका घेतल्याचे पाहायला मिळाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवसी यांनी नेम लावण्याचा प्रयत्न केला. तर अजित पवारांनी उपस्थित पत्रकारांवर बंदूक रोखत “महायुतीच्या बातम्या नीट द्या नाहीतर बघा”, असे विधान केले.

### तर सगळ्यांना उडवून टाकू

“आम्ही दोघं तर सगळ्यांना उडवून टाकू.” त्यांनी पुढे असेही म्हटले की, “आता एवढंच छापतील.”सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हातात एके४७ घेतल्याचे दिसत आहे. या व्हिडिओमध्ये कॅबिनेट मंत्री उदय सामंत आणि कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटीलही दिसत आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यातील चाकण येथे ‘निबे लिमिटेड’ प्रकल्पातील अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, शस्त्र, व संरक्षण सामग्रीची पाहणी केली. यावेळी मंत्री उदय सामंत, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, निबे लि.चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे, निबे डिफेन्स अँण्ड एरोस्पेस लि. चे संचालक प्रकाश भामरे आदी उपस्थित होते.दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अखत्यारित येणाऱ्या विविध विकासकामांचे आणि उपक्रमांचे उद्घाटन, भूमिपूजन आणि लोकार्पण केले.

# मालमत्ता कर थकबाकीदारांविरुद्ध कारवाई

## शिरूरमध्ये 16 थकीत मालमत्ता करापोटी करण्यात आल्या सील

। पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शिरुर नगरपरिषद घोडनदीच्या करसंकलन विभागाने मालमत्ता कर थकबाकीदारांविरुद्ध कठोर पावले उचलत कर वसुलीची मोहीम तीव्र केली आहे. थकबाकीदारांच्या मालमत्तांवर जप्तीच्या कारवाईला सुरुवात झाली असून शहरातील भाजी बाजारमधील गाळा क्र. १६ थकीत मालमत्ता करापोटी सील करण्यात आला असल्याचे मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनी सांगितले .**



यासंदर्भातील अधिक माहिती देताना कर संकलन विभागाचे कर निरीक्षक अक्षय बनगिनवार, सहाय्यक कर निरीक्षक दिपक कोल्हे चंद्रकांत पठारे यांनी सांगितले की शिरुर शहरात एकुण मालमत्ता १४१२८ आहे. त्यात शासकीय कार्यालय ८४ आहेत. यंदाचा वर्षाकरीता मालमत्ता करवसूलीसाठी एकूण मागणी १०.१६ कोटी रुपयांची आहे. १ जानेवारी २०२५ अखेरपर्यंत एकूण वसुली ३.३२ कोटी रुपयांची झाली आहे. शासकीय कार्यालयाची थकबाकी ३० लाख रुपयेची आहे. नगर परिषद चा मालमत्ता कर व पाणीपट्टी कर दरवर्षी ०१ एप्रिल रोजी देय होतो तसेच पहिल्या सहामाही पूर्वी मालमत्ता कर व पाणीपट्टी कर भरणे अनिवार्य आहे अन्यथा महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५० अ (१) अन्वये थकीत रकमेवर दरमहा २ % शास्ती आकारण्यात येते. सर्व मिळकत धारकांना आत्ता पर्यन्त भ्रमणध्वनीवर ४ वेळेस कर भरणा करणेबाबत संदेश पाठवण्यात आले आहे.

### 10 घंटा गाडी द्वारे दवंडी

डिसेंबर २०२४ पासून मालमत्ता कराचा भरणा करणेबाबत शहरात नगर परिषदच्या १० घंटा गाडी द्वारे दवंडी देखील देण्यात येत आहे. शिरूर नगरपरिषद घोडनदीच्या करसंकलन विभागाने मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर थकबाकीदारांविरुद्ध कठोर पावले उचलली आहेत. आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असल्याने, कर वसुलीची मोहीम तीव्र करण्यात आली आहे. या अंतर्गत, थकबाकीदारांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई ला सुरुवात झाली असून भाजी बाजार मधील गाळा क्र. १६ थकीत मालमत्ता करापोटी सील करण्यात आला आहे.

# उद्योजकांना त्रास दिल्यास "मकोका"!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे भूमिपूजन




।पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पुणे जिल्हा हे महाराष्ट्राच्या गुंतवणुकीचे कॅपिटल आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे भांडवल म्हणून पुण्याकडे पाहिले जाते. पुणे जिल्ह्यामध्ये अनेक प्रकारची गुंतवणूक येत आहे. या गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण ठेवणे महत्त्वाचे असून जिल्ह्यातील कोणत्याही उद्योग किंवा उद्योजकाला, कसल्याही प्रकारचा त्रास झाल्यास थेट मकोका अंतर्गत कारवाई करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात उद्योगांना कोणत्याह प्रकारचा त्रास होता कामा नये अशा सूचना देखील मुख्यमंत्र्यांनी केल्या.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी-चिंचवड नवीन इमारतीचे भूमिपूजन पोलीस अधिक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण नवीन इमारतीचे भूमिपूजन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयाचे पोलीस विश्रामगृहाचे भूमिपूजन,महाळुंगे औद्योगिक पोलीस संकुलाचे भूमिपूजन,'शिवनेरी' सभागृहाचे उदघाटन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विकास कामांचे व उपक्रमांचे ई-भूमिपूजन आणि लोकार्पण करण्यात आले. यावेळी पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार महेश लांडगे, योगेश कदम, विजय शिवतरे,अण्णा बनसोडे, शंकर जगताप, बापूसाहेब पठारे, शरद सोनवणे, बाबाजी काळे, सुनील शेळके, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आदी उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, पिंपरी चिंचवड शहराचे विस्तारीकरण गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात झाले. औद्योगीकरण वाढले अनेक क्लस्टर तयार झाले. या ठिकाणी गुंतवणूक देखील मोठ्या प्रमाणात वाढत आहे.हे सर्व होत असताना स्वतंत्र आयुक्तालयाची गरज निर्माण झाली. वेळोवेळी त्याबाबत मागणी होत गेली. ही मागणी आता पूर्णत्वाला जाणार आहे. 2025 मध्ये पिंपरी चिंचवड शहराचे नवीन आयुक्तालय स्वतंत्र इमारतीमध्ये स्थलांतरित होईल. सुसज्ज, अत्याधुनिक आणि खाजगी गृहनिर्माण धोरणालाही लाजवेल असे अद्यावत सरकारी कार्यालय निर्माण होणार आहे. अत्यंत निकडीची गरज म्हणून आयुक्तालयाची निर्मिती ती देखील सीएसआर फंडाच्या माध्यमातून हे कौतुकास्पद आहे.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले पुण्याच्या भागांमध्ये मधून मधून उद्योजकांकडून काही तक्रारी येतात. जाणीवपूर्वक त्रास, ब्लॅकमेलिंग आणि वसुलीच्या तक्रारी केल्या जातात.मात्र यापुढे असे काहीही खपवून घेतले जाणार नाही.यामध्ये कोणत्याही पक्षाचा, कोणाचाही पदाधिकारी असू दे थेट मकोका अंतर्गत कारवाई करा. पुणे हे महाराष्ट्राच्या गुंतवणुकीचे कॅपिटल आहे. त्यामुळे येथे उद्योगाला कोणत्याही प्रकारचा त्रास सहन केला जाणार नाही असे देखील फडणवीस म्हणाले.

### परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यास महाराष्ट्र अग्रेसर...!

चिखलीतील पोलीस आयुक्तालयाच्या भूमिपूजनापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मावळ, पुणे येथे लोट्टे इंडियाच्या हॅवमोर आईस्क्रीम उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन केले. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र जगात अग्रेसर असून महाराष्ट्र उद्योग विभाग यामध्ये महत्वाची भूमिका बजावत आहे, भारतातील ३५% थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे, या गुंतवणुकीमळे महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीचे केंद्र बनत आहे. दावोसमध्ये महाराष्ट्राने १६ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक खेचून आणली.महाराष्ट्र शाश्वत औद्योगिक प्रगतीसाठी सज्ज आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# जिजाऊ महिला बचत गटातर्फे हळदी-कुंकू समारंभ उत्साहात

## अध्यक्षा निशाताई पडवळ यांचे यशस्वी आयोजन, नेहरूनगर परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**नेहरूनगर येथील जिजाऊ महिला बचत गटातर्फे हळदी कुंकू समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास पिंपरी-चिंचवड शहरातून विविध ठिकाणांहून महिलांनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शविली. जिजाऊ महिला बचत गटाच्या अध्यक्षा निशाताई पडवळ यांनी यशस्वी आयोजन करत उपस्थित महिलांना वाण भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.**


तर उपाध्यक्षा प्रतिभा वानखडे, खजिनदार बबीता पवार, कार्यवाहक. धनश्री घाडगे, मधु शिंदे, रेखा ढाकले, राधा जाधव, सीमा गायकवाड, राणी वाघमारे, कोमल पोतेकर, कल्याणी दुर्गावळे, क्षितिजा काळभोर, मेघा घाडगे, डॉली गुप्ता, शरदा दातार आदींचे कार्यक्रम यशस्वीततेसाठी सहकार्य लाभले. यावेळेस कार्यक्रमाला नेहरूनगर संत तुकाराम नगर, फुलेनगर, विठ्ठल नगर, येथील महिलांनी उपस्थिती दर्शवली.



हळदी-कुंकू समारंभास यांची प्रामुख्याने उपस्थिती...

कार्यक्रमाला बचत गटाच्या अध्यक्षा व सामाजिक कार्यकर्त्या राखी धर, सुरेखा जगदाळे, वर्षा जगताप, पुनम सुरभी, सत्वशिला कांबळे, वनिता कांबळे, शारदा इंदलकर, स्वीटी मलातपुरे, शेख मॅडम, पुनम सिंग, राणी वाघमारे, कोमल वाघमारे, अनिता पवार, श्वेता चव्हाण, ललिता कटियार, शर्मिला लांडगे, गुलशन शेख, मोनिका ढाली, नूतन कांबळे, कांता बनसोडे, कौसर शेख, उषा कदम कल्पना श्वेते, निकिता मेहरे, वैशाली सूर्यवंशी, वैशाली शेवाळे, महालक्ष्मी सत्तार, गीता चौधरी, डिंपल चौधरी आदी महिलांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली. यावेळी आजीविका ब्यूरो संस्थेतर्फे महिला कामगारांना विविध योजनांची माहिती देण्यात आली.

## नामस्मरण, शरणागती आणि भगवत्प्राप्ती



भगवत्प्राप्तीला शरणागतीशिवाय मार्ग नाही, आणि शरणागतीला नामस्मरणासारखा उत्तम उपाय नाही. शरणागती म्हणजे, 'मी कर्ता' हा अभिमान नाहीसा होऊन, 'सर्व कर्तृत्व परमेश्वराचे आहे' ही दृढ भावना होणे. नामाशिवाय इतर साधनांत 'कृती' आहे; म्हणजे 'मी कर्ता' या अहंकाराला वाव आहे. स्मरण हा मनाचा धर्म असल्याने त्यात कृतीचा प्रश्नच येत नाही, म्हणून त्यात अहंकाराला वाव नाही; शिवाय, स्मरण किंवा विस्मरण या दोन्ही गोष्टी आपल्या हातात नाहीत; म्हणून नामाचे स्मरण झाले तरी त्यात स्वतःचे कर्तृत्व नसते, त्यामुळे 'मी कर्ता' ही जाणीव टिकू शकत नाही. 'मी नामस्मरण करतो' हा शब्दप्रयोगसुद्धा बरोबर नाही, कारण नामाचे स्मरण 'होत असते,' ते 'करू' म्हणून जमत नाही. म्हणून शरणागतीला नामस्मरणासारखे दुसरे साधन नाही. शरणागतीचा दुसरा अर्थ म्हणजे कायिक, वाचिक आणि मानसिक क्रिया थांबविणे. क्रिया न करणे हे कृती करण्यापेक्षा केव्हाही जास्त सोपे आहे; म्हणजेच शरणागती ही सहज-साध्य वाटली पाहिजे. पण अनुभव तसा येत नाही. जी गोष्ट अत्यंत सोपी वाटते ती करायला पुष्कळदा कठीण जाते असा अनुभव येतो. एखाद्याला मोटार वेगात चालव म्हटले तर तो ते सहज करील, पण अती हळू चालव म्हटले तर ते फार कठीण जाते. म्हणून काहीही कृती न करणे हे कृती करण्यापेक्षा फार कठीण असते. गीतेत भगवंतांनी अर्जुनाला 'तू नुसता मला शरण ये' असे सांगितले आहे. देहबुद्धी गेल्याशिवाय शरणागती येत नाही. देहबुद्धी, वासना, अहंकार ही सर्व एकच आहेत. जगातल्या वैभवाची आसक्ती आणि परमात्मप्राप्ती या दोन्ही गोष्टी एकत्र असू शकत नाहीत. म्हणूनच उद्धवाला श्रीकृष्णांनी एकांतात जाऊन हरिचिंतन करायला सांगितले आणि असे केल्यानेच माझी तुला खरी प्राप्ती होईल असे म्हणाले. याचा अर्थ हाच की, जगाकडे पाठ फिरविल्याशिवाय भगवंत मिळत नाही. भगवंताच्या प्राप्तीचे नियम आणि व्यवहारातल्या वस्तू प्राप्त करून घेण्याचे नियम यांमध्ये फरक आहे. मनामध्ये वासना उत्पन्न झाली असता ती तृप्त करून घेण्यासाठी देहाची आणि वस्तूंची हालचाल करणे, हा व्यवहार होय. सूक्ष्म वासना देहाच्या साह्याने जड बनणे हे व्यवहाराचे खरे स्वरूप आहे. परंतु भगवंताचे याच्या उलट आहे. भगवंत हा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे, त्याची प्राप्ती करून घेणे म्हणजे जडामधून सूक्ष्माकडे जाणे होय. तेव्हा त्याचे साधन हेही जडामधून सूक्ष्माकडे पोहोचविणारे असले पाहिजे. जड देहाशी संबंधित आणि सूक्ष्माशी निकट चिकटलेले असे साधन असेल तर ते नामच होय.

**बोधवचन:- अनन्यतेशिवाय भगवंताची प्राप्ती नाही; त्यातच भक्ति जन्म पावते.**

# धृतराष्ट्राचा थयथयाट, पट्टशिष्याचा गडगडाट!



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**डोळ्यासमोर पक्ष फुटला..अक्षरशः छकले उडाली..सारं काही घडलं ते पट्टशिष्य, प्रवक्ते संजय राऊत यांच्यामुळं..पण, हा विनाश उघड्या डोळ्यांनी पाहणं शक्य नसल्यामुळं उद्धव ठाकरे थेट धृतराष्ट्राच्या भूमिकेत शिरलेत..संधी मिळेल त्यावेळी आपल्या विरोधकांच्या नावानं त्यांनी थयथयाट सुरू केला आहे.. त्यांच्या पट्टशिष्याचा मात्र टीका, टोमणे आणि शिव्याशापांचा दररोज गडगडात सुरूच आहे!**



एकीकडे उद्धवसाहेब हे देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यापासून ते नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्यापर्यंत सर्व विरोधकांच्या नावानं बोटं मोडत आहेत..तर दुसरीकडं संजय राऊत यांचं मात्र निवडणूक आयोग, कॉंग्रेस पक्ष, आणि आपल्याशी संबंध नसलेल्या अनेक गोष्टींवर तोंडसुख घेणं सुरू आहे.

### हातची सत्ता गेली, तोल सुटला !

हातून सत्ता गेली, की भल्याभल्यांचा तोल सुटतो. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांचे उजवा हात असलेले प्रवक्ते संजय राऊत यांचीदेखील सध्या हीच अवस्था आहे. उद्धव ठाकरे कधीतरी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात किंवा पत्रकार परिषदेत एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करीत दंड थोपटत असतात, तर संजय राऊत रोज पत्रकार गोळा करून हव्या तेवढ्या आणि हव्या तशा थापा मारत असतात, याचे नाविन्य कोणालाच राहिले नाही. हे दोघेही आपल्या मालकीच्या दैनिकामधूनही मनाला येईल ते खरडत असतात. गेल्या आठवड्यात संजय राऊत यांनी अशाच काही वल्गना केल्या. त्यात त्यांनी एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपद घ्यावे लागल्यामुळे अतिशय निराश असल्याचा दावा केला होता. शिंदे आणि फडणवीसांमध्ये सध्या संबंध अतिशय ताणलेले आहेत, असेही ते सांगत होते. त्याचप्रमाणे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होऊन जवळजवळ दोन महिने उलटले तरी 'वर्षा' या मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थानी निवासाला का जात नाहीत? याबद्दलही त्यांनी शंका उपस्थित केली.

### सकाळचे भोंगे, रेड्याची शिंगे..

फडणवीसांचा परिवार वर्षा बंगल्यात काहीतरी जादूटोणा केला गेला आहे, त्यामुळे आपल्याला काही धोका होईल या भीतीनेच तिथे जाण्याचे टाळतो आहे, असा दावा राऊतानी केला. तेथील लॉनवर गुवाहाटीवरून कामाख्या देवीच्या मंदिरातून आणलेले रेड्याचे शिंग पुरले असून ते अशुभ असल्याची शंका व्यक्त केली होती. सद्यस्थितीत वर्षा बंगला पूर्णतः पाडून तिथे नवीन बंगला बांधण्याचा फडणवीस यांचा मानस असल्याचाही जावईशोध राऊतांनी लावला होता, सगळं कसं हास्यास्पद आहे.

### फालतू तर्क- वितर्क.. प्रचंड उधाण

शिवसेनेतून बंड करून बाहेर पडताना अमित शहा यांनी एकनाथ शिंदे यांना २०२४ नंतरही मुख्यमंत्री तुम्हीच राहाल, असा शब्द दिला होता म्हण, आणि तो शब्द न पाळल्याने शिंदे निराशही आहेत असे तर्क-कुतर्क संजय राऊत यांनी काढले होते. इथे मुळात प्रश्न असा येतो की अमित शहा असे काही बोलले होते किंवा त्यांनी असा काही शब्द दिला होता, हे अमित शहा किंवा एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांच्या कानात येऊन सांगितले का? किंवा मग शिंदे आणि शहा बोलत असताना संजय राऊत यांनी चोरून ऐकत होते का ?असाच जावई शोध २०१९ मध्ये संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांनी लावला होता. अमित शहा मुंबईत 'मातोश्री' वर आले असताना बाळासाहेबांच्या खोलीत त्यांनी अडीच वर्ष मुख्यमंत्रीपद तुम्हाला देऊ, असे वचन दिल्याचा उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांचा दावा होता. त्यावेळी त्या खोलीत म्हणे उद्धव ठाकरे आणि अमित शहा हे दोघेच होते. अमित शहा यांनी आपण असे कोणतेही वचन दिले नसल्याचा खुलासा केला होता. आता, इथे खरे कोण बोलते याचा शोध घेणे शक्य नव्हते.

### आठवा तो पूर्वीचा खोटारडेपणा

मात्र, उद्धव ठाकरेंनी मतदारांशी त्यापूर्वीही अनेकदा खोटेपणा केला होता. त्यामुळे त्यांच्या शब्दावर कोणीच विश्वास ठेवला नाही. त्यांनी २०१९ मध्ये जनमताचा अनादर करून कॉंग्रेससोबत जात सत्ता बळकवली असा जनसामान्यांचा समज झाला, आणि त्याची शिक्षा त्यांना मतदारांनी २०२४ मध्ये दिलीच आहे. त्यामुळे संजय राऊत यांची ही लोणकढी थाप आहे की त्यात काही तथ्य आहे हे अमित शहा आणि एकनाथ शिंदेच सांगू शकतात. सध्या ते काहीही बोलत नाहीत. त्यामुळे संजय राऊत किती खरे बोलतात हे परमेश्वरच जाणे. तसाच प्रकार वर्षा बंगल्याचाही आहे. फडणवीस वर्षा बंगल्यावर राहायला का गेले नाही याला त्यांची कारणे असतीलही. मात्र तिथल्या जमिनीत रेड्याची शिंगे पुरली आहेत असे वर्षा बंगल्याचा स्टाफ सांगतो, असे राऊत म्हणतात. ही मात्र राऊत यांची लोणकढी थापच आहे हे उभा महाराष्ट्र जाणतो. मात्र कुठे यांच्या तोंडाला लागता म्हणून राजकारणी आणि सामान्य माणूसही दुर्लक्ष करतो. ते राऊतांना फावते आहे. मित्रपक्षांनी भान ठेवावे.. उद्धव ठाकरेंचा पक्ष भाजपाला अडचणीत आणण्यासाठी प्रयत्न करीत आहे, आणि भाजपाचे मित्रपक्ष असलेले राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना, हे देखील म्हणावी तशी साथ देत नाहीत, हे चाणाक्षांच्या नजरेतून सुटलेले नाही. या सर्व ताणतणावात सत्ताधारी महायुतीतील शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यातील सदस्यांनी एक बाब लक्षात ठेवायला हवी, की तुमची आपापसातली भांडणे अशी चव्हाट्यावर आणून तुम्ही ज्या मतदारांनी तुम्हाला भरभरून मते दिले त्या मतदारांचाच विश्वास गमावता आहात. जर असेच चालू राहिले तर ते मतदार तुम्हाला जागा दाखवल्याशिवाय राहणार नाहीत.

### थोडेसे इतिहासात डोकावू या..

या राजकीय पक्षांना १९७७ ते १९७९ या काळात जनता पक्षाच्या राजवटीत जे काही घडले, त्याची आठवण द्यावीशी वाटते. १९७७ साली कॉंग्रेसला नाकारून नव्याने तयार झालेल्या जनता पक्षाला जनतेने भरभरून मते दिली. मात्र, या जनता पक्षातील विभिन्न विचारधारेचे लोक नंतर सत्तेसाठी परस्परांशी भांडू लागले. परिणामी त्यांचे सरकार अडीच वर्षातच कोसळले आणि देशात फेरनिवडणुका झाल्या. यावेळी १९८० च्या जानेवारी महिन्यात ज्या निवडणुका झाल्या, त्या निवडणुकीत मतदारांनी जनता पक्षाला पार नाकारले आणि पुन्हा एकदा इंदिरा गांधींच्या नेतृत्वातील कॉंग्रेसला स्पष्ट बहुमतासह सत्तेत आणले होते. जनतेला तुमची भांडणे नको असतात. त्यामुळे तुम्ही जर असे भांडत राहिलात तर जनता पुढल्या वेळी तुम्हाला तुमची जागा दाखवेल याचे भान भाजपाच्या मित्रपक्षांनी ठेवायला हवे.

### राऊतांचे रडणे सुरू राहू द्या..

संजय राऊत यांनी निरूद्योगी माणसाला काहीही काम नाही. तो त्याची रडगाण्याची भूमिका बजावत आहे. भाजपाला नीट सरकार चालवू द्यायचे नाही, ही कामगिरी बहुतेक सर्व विरोधकांनी त्याच्यावर सोपवली असावी.. आणि तीच तो व्यवस्थितपणे पार पाडत आहे. राऊतांच्या आरोपाला कसलीही भीक न घालता 'महायुती' च्या नेत्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवावी. तो एक फुसका बार आहे हे प्रत्येकाला माहित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ज्या मार्गाने जात आहेत, तोच स्वीकारण्यात सत्ताधाऱ्यांचे भले आहे, हे निश्चित!

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वाल्मिक कराडचा मुलगा कोट्याधीश!

## धनंजय मुंडेंचा मुलगा बेरोजगार कसा : करुणा मुंडे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात कौटुंबिक न्यायालयात गेलेल्या करुणा मुंडे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कौटुंबिक न्यायालयाने अंतरिम निकाल देत असताना तक्रारदार करुणा मुंडे यांना दरमहा १ लाख २५ हजार तर त्यांच्या मुलीला ७५ हजार रुपये असे एकूण दोन लाख रुपये देखभाल खर्च देण्याचा निकाल दिला आहे. दरम्यान हा देखभाल खर्च कमी असून मासिक १५ लाख रुपये देखभाल खर्च म्हणून द्यावा, अशी मागणी करत आता उच्च न्यायालयात जाणार असल्याचे करुणा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. तसेच वाल्मिक कराडचा उल्लेख करत त्यांनी आपल्या मुलाबाबतही भाष्य केले.**





प्रसारमाध्यमांशी बोलत असताना करुणा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर अनेक आरोप केले आहेत. यावेळी त्यांनी वाल्मिक कराडचाही उल्लेख केला. त्या म्हणाल्या, नोकराकडे ४ हजार कोटींची संपत्ती आढळून आली. पण मुंडेंचा एकुलता एक मुलगा २१ वर्षांचा असून त्याच्याकडे काहीच काम नाही. जनतेला मी हे सांगू इच्छिते की, मंत्र्याच्या मुलाकडे एक रुपयाचीही संपत्ती नाही. वाल्मिक कराडचा मुलगा कोट्यवधींच्या गाडीत फिरतो. पण आमच्या मुलाकडे एकही गाडी नाही. आमची मुलगी ट्रेनमधून फिरते.धनंजय मुंडेंना सरकारमधील उच्चपदस्थ लोकांकडून अभय मिळाल्यामुळे त्यांनी माझ्यावर अन्याय केला, असाही आरोप करुणा मुंडे यांनी केला.टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी बोलताना करुणा मुंडे म्हणाल्या की, यापुढे माझा उल्लेख करुणा शर्मा नाही तर करुणा धनंजय मुंडे असा करावा. कारण न्यायालयाने मला पहिल्या पत्नीचा दर्जा दिला आहे. त्यामुळे मी मुंडे नावासाठी जी लढाई लढत होती, ती यशस्वी झाली आहे.करुणा मुंडे पुढे म्हणाल्या की, मागच्या तीन वर्षांपासून मी खूप त्रास भोगला आहे. पोटगीसाठी मला खूप संघर्ष करावा लागला. पतीशिवाय एका महिलेला जीवन जगणे खूप अवघड असते. आपला पती जेव्हा उच्च पदावर असतो, तेव्हा पूर्ण व्यवस्था त्याच्याबाजूने काम करत असते. त्यांच्याकडे मोठे वकील होते. तरीही मी ही लढाई लढली. माझ्या वकिलांनी प्रामाणिकपणे लढून मला न्याय मिळवून दिला, याबद्दल मी त्यांचेही आभार मानते. खटल्याबाबत माहिती देताना करुणा मुंडे म्हणाल्या की, धनंजय मुंडे यांची मी पत्नी आहे की नाही? हे आधी आम्हाला सिद्ध करावे लागले. जे आमच्या वकिलांनी सिद्ध करून दाखवले आहे. करुणा मुंडे यांचे वकील गणेश कोल्हे यांनी टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी संवाद साधताना म्हटले की, करुणा मुंडे यांना मासिक १ लाख २५ हजार आणि मुलीला लग्नापर्यंत मासिक ७५ हजार रुपये देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. प्रसारमाध्यमांशी बोलत असताना करुणा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर अनेक आरोप केले आहेत. यावेळी त्यांनी वाल्मिक कराडचाही उल्लेख केला. त्या म्हणाल्या, नोकराकडे ४ हजार कोटींची संपत्ती आढळून आली. पण मुंडेंचा एकुलता एक मुलगा २१ वर्षांचा असून त्याच्याकडे काहीच काम नाही. जनतेला मी हे सांगू इच्छिते की, मंत्र्याच्या मुलाकडे एक रुपयाचीही संपत्ती नाही.

### पोटगीसाठी खूप संघर्ष

वाल्मिक कराडचा मुलगा कोट्यवधींच्या गाडीत फिरतो. पण आमच्या मुलाकडे एकही गाडी नाही. आमची मुलगी ट्रेनमधून फिरते.धनंजय मुंडेंना सरकारमधील उच्चपदस्थ लोकांकडून अभय मिळाल्यामुळे त्यांनी माझ्यावर अन्याय केला, असाही आरोप करुणा मुंडे यांनी केला. माध्यमांसोबत बोलताना करुणा मुंडे म्हणाल्या की, यापुढे माझा उल्लेख करुणा शर्मा नाही तर करुणा धनंजय मुंडे असा करावा. कारण न्यायालयाने मला पहिल्या पत्नीचा दर्जा दिला आहे. त्यामुळे मी मुंडे नावासाठी जी लढाई लढत होती, ती यशस्वी झाली आहे.करुणा मुंडे पुढे म्हणाल्या की, मागच्या तीन वर्षांपासून मी खूप त्रास भोगला आहे. पोटगीसाठी मला खूप संघर्ष करावा लागला.

# अखेर नैसर्गिक आपत्ती बाधितांना मिळाली मदत

## लाभार्थ्यांच्या खात्यांवर डीबीटीद्वारे 592 कोटी 34 लाख 90 हजार 530 रुपये वर्ग

। कोल्हापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अतिवृष्टी, पूर, अवेळी पाऊस, दुष्काळ, वादळी वारा, गारपीट आदी नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकरी व अन्य पात्र लाभार्थींच्या बँक खात्यावर ५९२ कोटी ३४ लाख ९० हजार ५३० रुपये वर्ग झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव - पाटील यांनी दिली.**



सन २०२२ आणि २०२३ आणि २०२४ मधील अतिवृष्टी, पूर बांधित. सन २०२२ - २३ आणि २०२३ - २४ मधील अवेळी पावसामुळे झालेले बाधित. सन २०२३ - २४ मधील अवेळी पाऊस, अतिवृष्टी बाधित, २०२३ मधील दुष्काळ बांधित आणि जून २०१९ मधील वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या पात्र लाभार्थीपैकी आधारकार्ड आणि बँक खाते संलग्न असलेल्या ५ लाख ३९ हजार ६०५ लाभार्थ्यांच्या खात्यांवर डीबीटीद्वारे ५९२ कोटी ३४ लाख ९० हजार ५३० रुपये वर्ग करण्यात आले. अमरावती विभागामध्ये ४ हजार ६७१ लाभार्थ्यांना ७ कोटी ४० लाख २९ हजार ८२० रुपयांची मदत मिळाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये ४ लाख ८३ हजार ८८३ लाभार्थीना ५१४ कोटी ८५ लाख २३ हजार २६० रुपये. नागपूर विभागात २० हजार ८९८ लाभार्थीना २६ कोटी ४३ लाख १० हजार ८६४ रुपयांची मदत मिळाली आहे. कोकण विभागामध्ये ८६५ लाभार्थ्यांना २१ लाख ८१ हजार ७८१ रुपयांची मदत मिळाली आहे. नाशिक विभागात १ हजार ९०९ लाभार्थ्यांना २ कोटी ७१ लाख ९१ हजार ७९१ रुपयांची मदत मिळाली आहे. पुणे विभागात २७ हजार ३७९ लाभार्थीना ४० कोटी ७२ लाख ५३ हजार १३ रुपयांची मदत मिळाली आहे.

### लाभार्थींच्या बँक खात्यावर 592 कोटी

बाधित झालेल्यांना करण्यात आलेल्या मदतीमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागाला सर्वाधिक मदत देण्यात आली आहे. एकूण ५९२ कोटी ३४ लाख ९० हजार ५३० रुपयांपैकी एकट्या छत्रपती संभाजीनगर विभागाला ५१४ कोटी ८५ लाख २३ हजार २६० रुपयांची मदत मिळाली. जिल्ह्याचा विचार करता बीड जिल्ह्याला सर्वाधिक मदत करण्यात आली असून, जिल्ह्यातील १ लाख १५ हजार ९१० लाभार्थींना १०६ कोटी १२ लाख ७७ हजार ४२२ रुपयांची मदत वर्ग करण्यात आली आहे. पात्र लाभार्थींच्या बँक खात्यावर ५९२ कोटी ३४ लाख ९० हजार ५३० रुपये वर्ग झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव - पाटील यांनी दिली.

# भारत अमेरिकेला जाब विचारू शकत नाही!

## ‘बेड्यां’वरून रणकंदन; विरोधकांमुळे संसदेत सरकारची कोंडी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेत अवैध वास्तव्य करणाऱ्या भारतीयांना हाता-पायात बेड्या घालून अमानुष वागणूक देत मायदेशी पाठवल्या मुद्द्यावरून गुरुवारी संसदेत विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडले. कोलंबियासारखा छोटा देश अमेरिकेविरोधात उभे राहण्याची हिंमत करू शकतो तर, भारताने अमेरिकेला जाब विचारण्याचे धाडस का दाखवू शकत नाही, असा सवाल राज्यसभेत विचारण्यात आला.**




त्यावर, बेड्या घालणे हा अमेरिकेच्या स्थलांतरण व आयात शुल्क संचालनालयाच्या मानक संचालन प्रक्रियेचा भाग आहे, असे उत्तर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दिले. त्याच वेळी स्थलांतरितांना अमानुष वागणूक मिळू नये यासाठी अमेरिकेशी बोलणी सुरू असल्याचा दावाही त्यांनी केला.अमेरिकेने १०४ भारतीयांना लष्करी विमानातून अमृतसरमध्ये आणून सोडले. त्यांच्याशी झालेली गैरवर्तवणूक, लष्करी विमानाचा वापर याबाबत केंद्र सरकारकडून निषेधही व्यक्त केला गेला नाही. उलट, अमेरिकेच्या स्थलांतरितांना बेड्या घालण्याच्या धोरणाचे परराष्ट्रमंत्री समर्थन करत आहेत, असा थेट आरोप तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार साकेत गोखले यांनी केला. या मुद्द्यावरून गुरुवारी विरोधकांनी संसदेच्या सभागृहांत व संसदेच्या आवारात तीव्र विरोध केल्यानंतर, जयशंकर यांनी राज्यसभेत निवेदन दिले. या निवेदनावर विरोधकांनी स्पष्टीकरणाची मागणी करताना प्रश्नांची सरबत्ती केली. मात्र एकाही प्रश्नाचे जयशंकर यांनी थेट उत्तर दिले नाही. त्यामुळे राज्यसभेत विरोधकांनी सभात्याग केला. लोकसभेतही काँग्रेससह इतर ‘इंडिया’च्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. त्यामुळे लोकसभा तीनवेळा तहकूब करावी लागली. राज्यसभेचे कामकाज एकदा स्थगित करावे लागले. राज्यसभेत निवेदन देण्याआधी जयशंकर यांनी पंतप्रधान मोदींची भेट घेतली. स्थलांतरितांशी प्रवासामध्ये गैरवागणूक दिली जाऊ नये यासाठी अमेरिकेच्या प्रशासनाशी चर्चा केली जात असल्याचे जयशंकर म्हणाले. एखाद्या देशाचे नागरिक दुसऱ्या देशात अवैधपणे वास्तव्य करत असल्याचे आढळले तर त्यांना परत घेणे हे मूळ देशाचे कर्तव्य आहे. हे धोरण फक्त भारतापुरते नाही तर सर्व देशांना आपापले नागरिक परत घ्यावे लागतात. २००९पासून अमेरिकेतून ७३४ भारतीयांना हद्दपार केले गेले. २०१६ मध्ये ही संख्या दुप्पट होऊन १,३०३ वर गेली. गेल्या वर्षी, बायडेन राजवटीच्या शेवटचे वर्षात १,३६८ भारतीयांना हद्दपार करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. अवैधपणे परदेशात जाण्याला परावृत्त केले पाहिजे, हेच सगळ्यांच्या हिताचे आहे. बेकायदा दुसऱ्या देशात प्रवेश करणारे नागरिक इतर गुन्ह्यांचे बळी ठरतात. योग्य कागदपत्रांशिवाय भारतीय नागरिकांना अमेरिकेत पाठवणाऱ्या एजंटांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासनही परराष्ट्रमंत्र्यांनी दिले. स्थलांरितांची पाठवणी होणार असल्याचे सरकारला माहिती होते. आपल्या नागरिकांसाठी कोलंबिया विमान पाठवू शकतो, तर भारताने का पाठवले नाही? आणखी किती भारतीयांना मायदेशी पाठवले जाणार आहे? पंतप्रधान मोदी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीत हा मुद्दा उचलणार का? परत आलेल्या नागरिकांची अमेरिकेतील संपत्ती परत मिळवण्यासाठी प्रयत्न करणार का? अवैध वास्तव्य करणारे ७.२५ लाख भारतीय अमेरिकेत आहेत. त्यांनाही परत पाठवले जाणार का? लष्करी विमानातून पाठवणी करताना दिलेली वागणूक दहशतवाद्यांना दिलेल्या वागणुकीसारखी नव्हती का?

### संसदेच्या आवारात तीव्र विरोध

बेड्या घालणे हा अमेरिकेच्या स्थलांतरण व आयात शुल्क संचालनालयाच्या मानक संचालन प्रक्रियेचा भाग आहे, असे उत्तर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दिले. त्याच वेळी स्थलांतरितांना अमानुष वागणूक मिळू नये यासाठी अमेरिकेशी बोलणी सुरू असल्याचा दावाही त्यांनी केला.अमेरिकेने १०४ भारतीयांना लष्करी विमानातून अमृतसरमध्ये आणून सोडले. त्यांच्याशी झालेली गैरवर्तवणूक, लष्करी विमानाचा वापर याबाबत केंद्र सरकारकडून निषेधही व्यक्त केला गेला नाही. उलट, अमेरिकेच्या स्थलांतरितांना बेड्या घालण्याच्या धोरणाचे परराष्ट्रमंत्री समर्थन करत आहेत, असा थेट आरोप तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार साकेत गोखले यांनी केला. या मुद्द्यावरून गुरुवारी विरोधकांनी संसदेच्या सभागृहांत व संसदेच्या आवारात तीव्र विरोध केल्यानंतर, जयशंकर यांनी राज्यसभेत निवेदन दिले. या निवेदनावर विरोधकांनी स्पष्टीकरणाची मागणी करताना प्रश्नांची सरबत्ती केली. मात्र एकाही प्रश्नाचे जयशंकर यांनी थेट उत्तर दिले नाही. त्यामुळे राज्यसभेत विरोधकांनी सभात्याग केला. लोकसभेतही काँग्रेससह इतर ‘इंडिया’च्या सदस्यांनी घोषणाबाजी केली.

# नावही माहिती नसलेल्या एजंटला दिले ४५ लाख

## सहा महिन्यांचा प्रवास नी मेक्सिको बॉर्डरवरून परत भारतात

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पुन्हा एकदा अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्यानंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक निर्णयांचा धडाका लावला आहे. यामध्ये बेकायदेशीररित्या अमेरिकेत गेलेल्या भारतीयांना मायदेशी पाठवण्याच्या निर्णयाचाही समावेश आहे. दरम्यान काल अमेरिकेतून १०४ भारतीयांना लष्करी विमानातून माघारी पाठवले आहे.**

दरम्यान या मायदेशी आलेल्या या १०४ भारतीयांमध्ये पंजाबच्या होशियारपूर जिल्ह्यातील ठाकरवाल गावातील ४१ वर्षीय रकिंदर सिंग यांचाही समावेश आहे. ज्याच्याकडून एका ट्रॅव्हल एजंटने त्याला कायदेशीररित्या अमेरिकेत पोहचवण्यासाठी तब्बल ४५ लाख रुपये घेतले होते. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये पंजाबहून अमेरिकेचा प्रवास सुरू केल्यानंतर सहा महिन्यांनी, रकिंदर अमेरिकेत बेकायदेशीरपणे पोहचला होता. आता हद्दपार झालेल्या १०४ भारतीयांमध्ये रकिंदर सिंगचाही समावेश आहे. ज्या ट्रॅव्हल एजंटने रकिंदर यांना अमेरिकेत कायदेशीररित्या पोहचवण्याचे वचन दिले होते, तो दुबईचा असून, त्याने साबू या नावाने



आपली ओळख सांगितली होती.दरम्यान रकिंदर यांच्या या अमेरिका प्रवासादरम्यान त्याला अनेक प्रवासी भेटले. तेव्हा त्यांना धक्कादायक माहिती मिळाली. ज्या एजंटने रकिंदर यांना त्याचे नाव साबू असल्याचे सांगितले होते, त्याने इतर काहींना त्याचे नाव राजू, लिओ असल्याचे सांगितले होते. तो वेगवेगळ्या लोकांना वेगवेगळी नावे सांगून त्यांना अमेरिकेत सुरक्षित प्रवेश देण्याचे आश्वासन द्यायचा. असे वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.या प्रकरणी अधिक माहिती देताना रकिंदर यांनी सांगितले की, “पंजाबीत बोलणाऱ्या साबूशी माझी कधीच भेट झाली नाही. इतकेच नव्हे तर मोबाइलवरही कधी त्याचा फोटो पाहिला नाही. तो फक्त वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय क्रमांकावरून व्हॉट्सअॅप कॉलद्वारे बोलायचा. तो स्वतः पैसे घेण्यासाठी कधीच येत नव्हता. यासाठी तो त्याची माणसे पाठवत असे.

### आयुष्याची कमाई गेली


आमचा अमेरिकेकडे प्रवास जसजसा पुढे जात होता तसतसे त्याचे लोक पंजाबमधील माझ्या कुटुंबाकडून हप्त्यांमध्ये पैसे गोळा करायचे. आम्ही ज्या ज्या देशात गेलो तिथे त्याचे लोक होते. आम्ही सीमेवर पोहोचण्यापूर्वी त्याने माझ्याकडून ४५ लाख रुपये घेतले होते. इतकेच नव्हे तर आम्ही भारतात परतू नये म्हणून त्याच्या माणसांनी आमचे पासपोर्टही जप्त केले होते.”सध्या जालंधरमध्ये राहणारे रकिंदर यांनी १२ वर्षे ऑस्ट्रेलियात काम केले आहे. ते विद्यार्थी व्हिसावर ऑस्ट्रेलियाला गेले होते.

# प्रसिद्ध अभिनेता सोनू सूद विरोधात अटक वॉरंट जारी...

प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेता सोनू सूद अडचणीत आला आहे. सोनू सूदच्या विरोधात पंजाबच्या लुधियाना ज्यूडिशियल मॅजिस्ट्रेट रमणप्रीत कौर यांनी अटक वॉरंट जारी केलं आहे. कोर्टात साक्ष देण्यासाठी सोनू सूदला वारंवार बोलावण्यात आलं होतं. अनेक नोटिसा पाठवूनही सोनूने त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळेच त्याच्या अटकेचं वॉरंट जारी करण्यात आलं आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. त्यावर आता सोनू सूद काय प्रतिक्रिया देणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. याप्रकरणी लुधियानातील वकील राजेश खन्ना यांनी मोहित शुक्ला नावाच्या व्यक्तीच्या विरोधात 10 लाख रुपयांची फसवणूक केल्याचा खटला दाखल केला आहे. त्यात नकली रिजिका नाण्यात गुंतवणूक करण्यासाठी लालच देण्यात आल्याचा आरोप आहे. वकील राजेश यांनी या प्रकरणात अनेक गंभीर आरोप केले आहेत. त्यात फसवणूक केल्याचाही आरोप आहे.

### काय आहे प्रकरण?

या तक्रारीमुळे वकील राजेश खन्ना यांनी सोनू सूद यांना साक्ष देण्यासाठी कोर्टात बोलावलं होतं. परंतु, वारंवार समन्स पाठवूनही सोनू सूद कोर्टात



साक्षीसाठी आला नाही. सोनू गैरहजर राहत असल्यानेच कोर्टाने आता सोनूच्याच अटकेचं वॉरंट काढलं आहे.

### 10 तारखेला सुनावणी

हे वॉरंट मुंबईच्या अंधेरी पश्चिमेतील ओशिवरा पोलीस ठाण्याकडे पाठवण्यात आलं आहे. यात सोनूला अटक करून कोर्टात हजर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याप्रकरणाची पुढची सुनावणी 10 फेब्रुवारी रोजी होणार आहे. दरम्यान, टीव्ही९शी सोनू सूदने संवाद साधला. हा निव्वळ पब्लिसिटी स्टंट आहे. या प्रकरणाशी माझं काहीच घेणंदेणं नाही, असं सोनूने म्हटलंय.

### सोनू काय म्हणाला?

मी कोणत्याही गोष्टीचा ब्रँड अम्बेसेडर नाहीये. मी वकिलाला यापूर्वीच उत्तर दिलेलं आहे. 10 फेब्रुवारी रोजी पुन्हा उत्तर देईन. मला एवढंच सांगायचं की, मी कोणत्याच गोष्टीचा ब्रँड अम्बेसेडर नाहीये. या प्रकरणाची मला गंधवार्ताही नाही. माझं या प्रकरणाशी काही घेणंदेणंच नाहीये. फक्त या प्रकरणात पब्लिसिटी करायची आहे, म्हणून या गोष्टी होत आहेत, असंही तो म्हणाला.

## सलमान पोहोचला हैदराबादमध्ये

बॉलीवूडचा भाईजान सध्या त्याच्या कामाबरोबर वैयक्तिक आयुष्यामुळे खूप चर्चेत आहे. सलमान खानला सातत्याने जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत. असं असलं तरी सलमान कामासंदर्भात दिलेला शब्द पाळताना दिसत आहे. 'बिग बॉस १८'च्या चित्रीकरणानंतर त्याने 'सिकंदर' चित्रपटाच्या चित्रीकरणाला देखील सुरुवात केली आहे. 'सिकंदर' चित्रपटाच्या चित्रीकरणानिमित्ताने सलमान खान नुकताच हैदराबादमध्ये पोहोचला आहे.२०२५ला ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणाऱ्या 'सिकंदर' चित्रपटाचं चित्रीकरण हैदराबादच्या ताज फलकनुमा पॅलेसमध्ये होत आहे. त्यामुळे सलमान खान हैदराबादमध्ये पोहोचला आहे. ताज फलकनुमा पॅलेस हे एक ऐतिहासिक ठिकाण आहे. याच ठिकाणी 'सिकंदर' चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या एक दिवसाआधी सलमान खान पोहोचला.

## आरुषीने गुपचूप लग्न उरकलं

'लव्ह आज कल २' फेम अभिनेत्री आरुषी शर्माने गुपचूप लग्न उरकलं आहे. तिच्या लग्नाचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अभिनेत्रीने बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टरशी लग्नगाठ बांधली आहे. तिने अद्याप लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले नाही, पण तिच्या लग्नात हजर असलेल्या मंडळींनी काही फोटो पोस्ट केले आहेत. 'काला पानी' या वेब सीरिजमध्ये शेवटची दिसलेली आरुषी शर्माने आयुष्यभरासाठी तिचा जोडीदार निवडला आहे. अभिनेत्रीने १८ एप्रिल रोजी हिमाचल प्रदेशमध्ये लग्नगाठ बांधली. तिने प्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टर वैभव विशांतशी गुपचूप लग्न केलं. आरुषी आणि वैभवने अत्यंत खासगी सोहळ्यात सात फेरे घेतले. या लग्नाला फक्त त्यांचे कुटुंबीय आणि काही जवळचे मित्र उपस्थित होते.आरुषी शर्माच्या लग्नाचे फोटो खूप व्हायरल होत आहेत. ती पेस्टल रंगाचा लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. वैभवनेही खूप सुंदर अशी नक्षीदार शेरवानी घातली आहे.आत्तापर्यंत त्याने 'बडे मियाँ छोटे मियाँ', 'पीके', 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' आणि 'बदलापूर' सारख्या जवळपास ५० चित्रपटांसाठी कास्टिंगचं काम केलं आहे. विशेष म्हणजे वैभवने 'काला पानी' या वेब सीरिजसाठी कास्टिंग डायरेक्टर म्हणूनही काम पाहिलं होतं.



## राजकुमार रावने प्लास्टिक सर्जरी केली

आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये दिसल्यापासून चर्चेत आहे. या कॉन्सर्टमध्ये अभिनेता नेहमीपेक्षा थोडा वेगळा दिसत होता. दरम्यान, या कॉन्सर्टमधील राजकुमारचे पापाराझींनी काढलेले फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आणि राजकुमारने प्लास्टिक सर्जरी केल्याच्या चर्चांना उधाण आलं. त्यावर आता राजकुमारनं मौन सोडलं आहे. नुकत्याच 'बॉलीवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, "मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केली नाही आहे. व्हायरल झालेला फोटो फक्त एक वाईट फोटो होता,असं आपण म्हणू शकतो. त्या फोटोला टच-अप्स केले आहेत. मला खूपदा वाटतं की, माझी त्वचा अशी नितळ आणि चमकदार असती, तर किती चांगलं झालं असतं. कारण- त्या फोटोत मी तसाच दिसत होतो. मी तेव्हा कोणताच मेकअप केला नव्हता; पण मलाही वाटलं की, तो फोटो खूप विचित्र दिसत होता. कॅमेऱ्यात कैद झालेला तो एक वाईट क्षण होता. मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केलेली नाही."आठ वर्षांअगोदर मी हनुवटीसाठी काही फिलर वर्क केलेलं. कारण- मला आत्मविश्वास असल्यासारख दिसायचं होतं. तेव्हा माझ्या त्वचाशास्त्रज्ञानं मला सल्ला दिला होता आणि मी त्याप्रमाणे केलं. त्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला का? तर हो. त्यानंतर मी आणखी चांगले चित्रपट केले आहेत आणि त्यामुळे माझा दृष्टिकोन बदलला आहे.

## ऐश्वर्याने नाकारलेला ब्रॅड पिटबरोबरचा चित्रपट



ऐश्वर्या रायला जवळपास दोन दशकांपूर्वी अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपटांच्या ऑफर आल्या होत्या. कान फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'देवदास' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर हॉलीवूडमध्येही ऐश्वर्याची चर्चा होती. याच काळात तिला ब्रॅड पिटच्या 'ट्रॉय' चित्रपटातील महत्त्वपूर्ण भूमिकेची ऑफर देण्यात आली होती. मात्र, तरीही तिने तो सिनेमा करण्यास नकार दिला होता. ऐश्वर्या रायला ब्रॅड पिटच्या ट्रॉय नावाच्या चित्रपटात काम करण्याची ऑफर मिळाली होती, पण त्यासाठी तिला तिथे राहून ६ ते ९ महिने त्या चित्रपटासाठी शूटिंग करावं लागणार होतं. एवढी चांगली ऑफर ऐश्वर्याने नाकारली होती, कारण तिने काही बॉलीवूड चित्रपट स्वीकारले होते. त्यामुळे तिला आपली कमिटमेंट मोडायची नव्हती. हा चित्रपट नाकारला असला तरी नंतर ऐश्वर्या राय 'ब्राइड अँड प्रिज्युडिस' आणि 'पिंक पार्टनर 2' सारख्या हॉलीवूड चित्रपटांमध्ये दिसली होती.'स्क्रीन'शी बोलताना ऐश्वर्याने या ऑफरबद्दल सांगितलं होतं. ती म्हणाली होती की निर्मात्यांनी तिला या चित्रपटासाठी ६ ते ९ महिने द्यावे लागतील असं म्हटलं होतं. मात्र, त्या तुलनेत तिची भूमिका महत्त्वाची असली तरी इतका वेळ देण्याइतकी मोठी नव्हती. हॉलीवूडचं काम कसं असतं हे त्यावेळी माहीत नव्हतं, असंही तिने सांगितलं होतं. "मी ६ ते ९ महिने त्यांच्या चित्रपटासाठी द्यावे, अशी त्यांची इच्छा होती कारण हा एक मोठा चित्रपट होता," असं ती म्हणाली होती."ऑफर आल्यावर तुम्ही साहजिकच सगळा विचार करता. तुमची भूमिका काय, तुम्हाला त्यासाठी किती दिवस द्यायचे आहेत या सगळ्या गोष्टी. सिनेमा मोठा होता तरी मी ज्या लहान चित्रपटांसाठी होकार दिले होते.

# भारताचा इंग्लंडवर सहज विजय!

## गिलची वादळी खेळी; चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी टीम इंडियाची जय्यत तयारी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शुबमन गिलची ८७ धावांची खेळी, श्रेयस अय्यरची वादळी आणि महत्त्वपूर्ण फटकेबाजी, संकटमोचक अक्षर पटेलचं अर्धशतक अन् भारताच्या गोलंदाजांची भेदक गोलंदाजी यासह भारतीय संघाने इंग्लंड संघावर पहिल्या वनडेत सहज विजय मिळवला आहे.इंग्लंडवरील ५ विकेट्सने मिळवलेल्या विजयासह भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी चांगल्या लयीत असल्याचे दाखवून दिले आहे.नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी उतरलेला इंग्लंड २४८ धावा करत ४७.४ षटकांत सर्वबाद झाला. तर भारताने ३८.४ षटकांत इंग्लंडवर ५ विकेट्सने विजय नोंदवला.**



चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तयारीसाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या मालिकेसाठी टीम इंडिया दीर्घ कालावधीनंतर एकदिवसीय क्रिकेट खेळत होती. पण भारताने या सामन्यात चांगली कामगिरी करत टीम इंडिया तयारीत असल्याचे दिसत आहे. यापूर्वी, भारतीय संघाने जुलै-ऑगस्टमध्ये श्रीलंका दौऱ्यावर ३ एकदिवसीय सामने खेळले होते, जी विश्वचषक २०२३ च्या अंतिम सामन्यानंतर भारताची पहिली आणि एकमेव एकदिवसीय मालिका होती. भारतीय संघाने या सामन्यात प्रथम गोलंदाजी करत मोहम्मद शमीने दमदार सुरुवात केली. पण दुसऱ्या बाजूने इंग्लिश सलामीवीराने एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या हर्षित राणाची चांगलीच धुलाई केली. फिल सॉल्ट आणि बेन डकेटने अवघ्या ९ षटकांत ७५ धावा करत जोरदार सुरुवात केली. पण फिल सॉल्ट धावबाद झाल्यानंतर टीम इंडियाने पुनरागमन केलं. यात हर्षितची महत्त्वाची भूमिका महत्त्वाची होती. त्याने आधी बेन डकेट (३२) आणि नंतर हॅरी ब्रूक (०) यांची विकेट घेतली. रवींद्र जडेजाने पुन्हा जो रूटला (१९) आपला बळी बनवले.मधल्या फळीत कर्णधार जोस बटलरसह युवा अष्टपैलू जेकब बेथलने संघाचा डाव उचलून धरला. प्रथम बटलरने (५२) अर्धशतक झळकावले आणि नंतर तो बाद झाल्यानंतर जेकब बॅथल (५१) यांनी संघाला २०० धावांचा टप्पा गाठून दिला. त्याने आपले अर्धशतकही पूर्ण केले मात्र तोही जडेजाच्या गोलंदाजीवर बाद झाला. शेवटी, जोफ्रा आर्चरने (२१) काही मोठे फटके मारले आणि संघाला २४८ धावांपर्यंत नेले. हर्षित आणि जडेजाने प्रत्येकी ३ विकेट घेतले, तर शमी, अक्षर आणि कुलदीप यादव यांना १-१ विकेट मिळवण्यात यश मिळाले.२४९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पदार्पणवीर यशस्वी जैस्वाल आणि कर्णधार रोहित शर्माने सुरूवात केली. पण आर्चर आणि साकिब महमूद यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीसमोर फारश्या धावा दोघांना करता आल्या नाहीत आणि दोघेही झेलबाद होत माघारी परतले. कर्णधार रोहितने (२) पुन्हा एकदा निराशा केले. कसोटी फॉर्मेटमध्ये त्याचा खराब फॉर्म वनडेमध्येही कायम राहिला. रोहित बाद झाल्यानंतर मैदानावर आलेल्या श्रेयस अय्यरने आक्रमक सुरुवात केली आणि भारतीय संघात पुन्हा एकदा दमदार पुनरागमन केलं. श्रेयस अय्यर आणि शुबमन गिल यांनी दमदार खेळी करत विजयाचा पाया रचला. विशेषतः, अय्यरने येताच आक्रमक फलंदाजी केली आणि आर्चरच्या षटकात २ षटकार आणि १ चौकारा लगावत आपले मनसुबे जाहीर केले. अय्यरने अवघ्या ३० चेंडूत अर्धशतक झळकावले पण त्याला आपल्या डावाचे मोठ्या धावसंख्येमध्ये रूपांतर करता आले नाही.श्रेयस अय्यर बाद झाल्यानंतर अक्षरला बढती मिळाली आणि त्याने गिलबरोबर १०८ धावांची भागीदारी केली, ज्यामुळे विजय निश्चित झाला. अर्धशतक झळकावल्यानंतर अक्षर आदिल रशीदच्या गोलंदाजीवर बाद झाला, तर शुबमन गिल त्याच्या शतकापूर्वी ८७ धावांवर बाद झाला. यानंतर हार्दिक पंड्या आणि रवींद्र जडेजाने संघाला विजयापर्यंत नेले. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तयारीसाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या मालिकेसाठी टीम इंडिया दीर्घ कालावधीनंतर एकदिवसीय क्रिकेट खेळत होती.

### शमीने दमदार सुरुवात केली

भारतीय संघाने जुलै-ऑगस्टमध्ये श्रीलंका दौऱ्यावर ३ एकदिवसीय सामने खेळले होते, जी विश्वचषक २०२३ च्या अंतिम सामन्यानंतर भारताची पहिली आणि एकमेव एकदिवसीय मालिका होती.भारतीय संघाने या सामन्यात प्रथम गोलंदाजी करत मोहम्मद शमीने दमदार सुरुवात केली. पण दुसऱ्या बाजूने इंग्लिश सलामीवीराने एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या हर्षित राणाची चांगलीच धुलाई केली. फिल सॉल्ट आणि बेन डकेटने अवघ्या ९ षटकांत ७५ धावा करत जोरदार सुरूवात केली. पण फिल सॉल्ट धावबाद झाल्यानंतर टीम इंडियाने पुनरागमन केलं. यात हर्षितची महत्त्वाची भूमिका महत्त्वाची होती. प्रथम बटलरने (५२) अर्धशतक झळकावले आणि नंतर तो बाद झाल्यानंतर जेकब बॅथल (५१) यांनी संघाला २०० धावांचा टप्पा गाठून दिला. त्याने आपले अर्धशतकही पूर्ण केले मात्र तोही जडेजाच्या गोलंदाजीवर बाद झाला. शेवटी, जोफ्रा आर्चरने (२१) काही मोठे फटके मारले आणि संघाला २४८ धावांपर्यंत नेले.

---

# पाकिस्तानचा संघ घरच्या मैदानावर खेळत आहे सामने

## बाबर आझम चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी वेगळ्याच कारणामुळे चिंतेत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**येत्या काही दिवसांत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे सामने खेळवले जाणार आहेत, या आयसीसी स्पर्धेचे यजमानपद पाकिस्तानकडे आहे. तर पाकिस्तानचा संघ घरच्या मैदानावर सराव करत आहे. मात्र याआधीच संघाचा स्टार फलंदाज बाबर आझमबरोबर एक दुर्दैवी घटना घडली, ज्यामुळे तो हैराण झाला आहे. स्पर्धेच्या तयारीत व्यस्त असलेल्या बाबरची अचानक एक मौल्यवान वस्तू हरवली.**



बाबर आझमने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत त्याचा मोबाईल फोन हरवल्याचे सांगितले आहे. पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमने गुरुवारी ६ फेब्रुवारी रोजी सोशल मीडिया पोस्टद्वारे सर्वांना आश्चर्यचकित केले. बाबर आझमने एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर एक पोस्ट करून आपला मोबाईल हरवल्याचे सांगितले. स्टार फलंदाजाने पोस्टमध्ये म्हटले आहे की,"माझा फोन हरवला आहे आणि सर्व कॉन्टॅक्टही गेले आहेत. मला (फोन) सापडल्यानंतर मी सर्वांशी संपर्क करेन."बाबरची पोस्ट पाहून काही चाहत्यांनी चिंता व्यक्त केली आणि त्याचा फोन त्याला पुन्हा द्यावा अशी विनंतीही केली, तर बहुतेकांनी स्टार फलंदाजाची फिरकी घेतली. एकदिवसीय क्रिकेटमध्ये मुख्यतः मधल्या फळीतील फलंदाज असलेला बाबर आगामी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये सलामीवीर म्हणून नवीन भूमिका पार पडणार आहे.सध्या बाबरसह संपूर्ण पाकिस्तानी संघ लाहोरमध्ये सराव सामने खेळून चांगला सराव करण्यात व्यस्त आहेत. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी पाकिस्तानला तिरंगी मालिकाही खेळायची आहे, ज्यामध्ये त्यांचा सामना दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडशी होणार आहे.गेल्या काही काळापासून बाबर आझम फार चांगली कामगिरी करू शकलेला नाही.

### आयसीसी स्पर्धेचे यजमानपद पाकिस्तानकडे

ही तिरंगी मालिका त्याच्यासाठी महत्त्वाची असणार आहे. गेल्या महिन्यात त्याने दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर कसोटी मालिकेत ३ अर्धशतकं झळकावली होती, पण त्याआधी आणि त्यानंतरही त्याची बॅट शांत राहिली. ही मालिकाच नाही तर चॅम्पियन्स ट्रॉफीही बाबरसाठी महत्त्वाची आहे, कारण त्याला गेल्या अनेक आयसीसी स्पर्धांमध्ये सतत अपयशाचा सामना करावा लागला आहे.येत्या काही दिवसांत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे सामने खेळवले जाणार आहेत, या आयसीसी स्पर्धेचे यजमानपद पाकिस्तानकडे आहे.

## मोशी येथे 101 बेडच्या धनश्री हॉस्पिटलचे उद्घाटन

# तंत्रज्ञानाचा आरोग्य व्यवस्थेला बुस्टर!: फडणवीस

## आरोग्य सेवा मजबूत करण्यावर सरकारचा भर - अजित पवार

| पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**आधुनिक तंत्रज्ञानातील रोबोटिक्स व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आरोग्य सेवेसाठी उपयुक्त आहे. योग्य निदान होऊन अनेक गंभीर आजारांवर, गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करता येतात. रोबोटिक्स तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अचूक वापरामुळे रुग्णाला जीवदान मिळते. महाराष्ट्र शासन जवळपास तेराशे आरोग्यसेवा नागरिकांना देत आहे; तर केंद्र सरकारच्या १८०० आरोग्य सेवा दिल्या जातात. केंद्राप्रमाणेच अधिकाधिक सेवा देण्याचा प्रयत्न महाराष्ट्र सरकार करत आहे. या सेवा देण्यामध्ये खाजगी रुग्णालय महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. धनश्री हॉस्पिटलने या सेवा देण्याचा प्रयत्न करावा, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.**



डॉ. पटवर्धन यांनी मोशी येथे उभारलेल्या अत्याधुनिक १०१ बेडच्या धनश्री हॉस्पिटलचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अण्णा बनसोडे, शरद सोनवणे, विधानपरिषद आमदार अमित गोरखे, पिंपरी चिंचवड शहर भाजपा कार्याध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी महापौर मंगला कदम, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, धनश्री हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजीव पटवर्धन, डॉ. अपूर्व पटवर्धन, डॉ. सलोनी पटवर्धन, विजय रासकर, स्वाती रासकर, वैष्णवी रासकर, डॉ. अश्विन भालेराव, डॉ. कांचन दुरूगकर-भालेराव आदी उपस्थित होते.

आरोग्यसेवा मजबूत असेल तर देश प्रगती करू शकतो. राज्य सरकार आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी भर देत असून रूग्णांसाठी विविध योजना सुरू केलेल्या आहेत. सरकारी रुग्णालयांप्रमाणे खाजगी रुग्णालयांच्या माध्यमातून आरोग्य सेवेच्या सरकारी योजना राबविल्या तर या योजनांना अधिक बळ मिळू शकते, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. 'ॐ सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः' या श्लोकात सांगितल्याप्रमाणे धनश्री हॉस्पिटल कार्य करीत आहे. माझ्याप्रमाणे पटवर्धन कुटुंब पुढील समाजाला आरोग्य सेवा देण्यासाठी कार्य तत्पर आहे. धनश्री हॉस्पिटलच्या आजपर्यंतच्या प्रवासात अनेकांचे सहकार्य लाभले. यापुढे ही असेच सहकार्य मिळेल असे डॉ. राजीव पटवर्धन मनोगत व्यक्त करताना म्हणाले. उद्घाटन समारंभास वैद्यकीय, औद्योगिक, व्यवसायिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सलोनी पटवर्धन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राजीव पटवर्धन यांनी आभार मानले.

### शुभेच्छा देताना होते पंचाईत - अजित पवार

रूग्णालयाच्या उद्घाटनाला आलो आहे; पण शुभेच्छा काय देऊ असा प्रश्न पडतो. कारण आपली अधिक भरभराट होवो असे म्हणता येत नाही, असे अजितदादा म्हणताच उपस्थितांनी हसून दाद दिली. धनश्री हॉस्पिटल आणि डॉ. राजीव पटवर्धन यांनी रूग्ण लवकर बरा होईल. उपचारासाठी आलेल्या रूग्णांना चांगली सेवा देऊन धनश्रीचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा अजितपवार यांनी दिल्या. पटवर्धन कुटुंब रंगलंय आरोग्य सेवेत - देवेंद्र फडणवीस अजित पवार शुभेच्छेचा धागा पकडून देवेंद्र फडणवीस म्हणाले, आलेला रूग्ण लवकर बरा होऊन घरी गेला पाहिजे. रूग्णालयात पुन्हा येण्याची गरज भासू नये. त्यामुळे धनश्री हॉस्पिटलचा नावलौकिक होईल. येथे एका छताखाली अनेक उपचार सुविधा रुग्णांना मिळतील आणि डॉ. पटवर्धन यांना हॉस्पिटल अधिक मोठे करावे लागेल, अशा शुभेच्छा देऊ असे फडणवीस यांनी दिल्या.

# पुण्याची ख्याती टिकविण्यासाठी पुरंदर विमानतळ गरजेचे- देवेंद्र फडणवीस

## विमानतळ भूसंपादनाचा प्रस्ताव राज्य सरकारकडे; तातडीने मंजूर करण्याचा विचार

| पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**पुरंदर विमानतळ हे पुण्याच्या विकासाला चार पटीने पुढे नेणार आहे. हा जिल्हा विकासचे इंझिन आहे. आज पुण्याच्या विकासातला मध्यमार्ग हे विमानतळ आहे.त्यामुळे जोपर्यंत नवीन विमानतळ बांधले जात नाही, तोपर्यंत आंतरराष्ट्रीय शहर म्हणून पुण्याची असलेली ख्याती मिळू शकत नाही. त्यासाठी पुरंदर विमानतळ होणे आवश्यक आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**



पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय, महाळूंगे औद्योगिक पोलीस संकूल, देहुरोड येथील पोलीस विश्रामगृहासह पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या भुमीपुजन समारंभप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, जलसंपदा मत्री राधाकृष्ण विखे-पाटील, गृह राज्यमंत्री योगेश कदम, उपस्थित होते. फडणवीस पुढे म्हणाले देशाच्या विकासात महाराष्ट्र अग्रेसर आहे. महाराष्ट्रासाठी पुणे जिल्हा अत्यंत महत्वाचा आहे. हा जिल्हा विकासचे इंजिन आहे. आज पुण्याच्या विकासातला मध्यमार्ग हा विमानतळ आहे. लोहगाव विमानतळ विकसित केले. नविन टर्मिनल केले. पुणे ही हवाई दलाची महत्त्वाची सदन कमांड आहे. याठिकाणी देशाच्या सुरक्षिततेसाठी हवाईदलाचे उपक्रम ३६५ दिवस चालवावेच लागतात. त्यासाठी धावपट्टी बंद करून बऱ्याचदा हवाईदलाला विमानतळ द्यावे लागते. त्यामुळे जोपर्यंत नवीन विमानतळ बांधले जात नाही, तोपर्यंत आंतरराष्ट्रीय शहर म्हणून पुण्याची असलेली ख्याती मिळू शकत नाही. त्यासाठी पुरंदर विमानतळ होणे आवश्यक आहे.त्याबाबतचा भुसंपादनाचा प्रस्ताव राज्य सरकारकडे आलेला आहे.

### माझे अवैध होर्डींग्ज सर्वात आधी काढा

महापालिकेने कृत्रिम बुद्धीमत्तेच्या (एआय) माध्यमातून आणलेले धोरण चांगले आहे. त्याच्या माध्यमातून अवैध होर्डींग्जवर लक्ष ठेवता येईल. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात अवैध होर्डींग्ज लावतात. सर्व राजकीय पक्ष होर्डींग्ज लावतात. पिपरी - चिंचवडमध्ये माझे अवैध होर्डींग्ज लावल्यास सर्वात आधी ते काढा. त्यामुळे इतरांचे होर्डींग्ज काढायला अडचण येणार नाही. ज्याला होर्डींग्ज लावायचे त्याने अधिकृतपणेच होर्डींग्ज लावावे, अशी सुचना फडणवीस यांनी केली.

त्याबाबत बैठकही घेतली आहे. सरकारकडून तात्काळ मान्यता दिली जाईल. त्याचे दर ठरविले जातील. कोणाचेही नुकसान होणार नाही. सर्वांना चांगले दर ठरवून जागेचे भुसपादन केले जाईल. हे केवळ विमानतळ असणार नाही, तर विमानतळाबरोबरच माल वाहतुकीचे केंद्र असणार आहे. त्यामुळे पुण्यामध्ये जे औद्योगिकीकरण झाले आहे. आयात आणि निर्यातीकरिता अर्थकारण या विमानतळाच्या माध्यमातून सुरू होईल. तरूणाईच्या हाताला रोजगार मिळेल, याकडेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!